




दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •



Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क



• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २३८ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.४ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## स्वर्गीय बाळूभाऊ धानोरकर यांच्या यशोगाथेला जयंतीनिमित्त अभिवादन



# एक शिक्षकपुत्र ते जनतेचा खासदार

**कुछ लोग थक कर बैठ गए, कुछ मंज़िल पर पहुँच गए,जो चलते रहे निरंतर, वही इतिहास रच गए।**

**या ओळी केवळ शायरी नसून एका असामान्य प्रवासाची खरीखुरी साक्ष देतात. एका सामान्य शिक्षकाचा मुलगा, स्वकर्तृत्वाच्या बळावर, संघर्ष करत करत लोकसभेत पोहोचतो ही एक विलक्षण यात्रा ठरते. राजकारणात घराणेशाही, जातपात, पैसा आणि पाठबळ महत्त्वाचं मानलं जातं. परंतु अशा परिस्थितीत जर कोणी पूर्णपणे सामान्य पार्श्वभूमीवरून आला आणि जनतेच्या मनावर राज्य करू लागला, तर तो प्रवास प्रेरणादायीच ठरतो. स्वर्गीय खासदार बाळूभाऊ धानोरकर यांची जीवनयात्रा ही अशाच प्रकारची दुर्मीळ आणि लोकाभिमुख होती. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा मागोवा घेत, स्मृतींना आदरांजली अर्पण करीत आहोत.**




संपादक
आशिष घुमे
e sahyandrinews@gmail.com



बाळूभाऊंचा जन्म चंद्रपूर जिल्ह्यातील एका अत्यंत सामान्य मध्यमवर्गीय शिक्षक कुटुंबात झाला. वडील शिक्षक असल्यामुळे शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि साधेपणाचं बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळालं. अभ्यासात चांगले आणि सामाजिक जाणिवा असलेले बाळूभाऊ शालेय जीवनातही नेतृत्वगुण दाखवू लागले होते. कॉलेजमध्ये शिकतानाही ते सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, इतर विद्यार्थ्यांना मदतीसाठी तत्पर राहणारे, आणि सार्वजनिक कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होणारे युवक म्हणून ओळखले जात.त्यांच्या कुटुंबातील अपेक्षा साध्याच होत्या नोकरी करून कुटुंबाला आधार द्यावा. पण बाळूभाऊंच्या मनात वेगळंच स्वप्न होतं – समाजासाठी काहीतरी मोठं करून दाखवायचं! राजकीय पार्श्वभूमी नसताना त्यांनी राजकारणात प्रवेश केला, हीच गोष्ट विलक्षण आहे. शिवसेनेच्या माध्यमातून त्यांनी जनसेवेचा मार्ग धरला. सुरुवातीला आंदोलने, सभा, लोकांच्या अडचणी सोडवणे यात ते सक्रिय राहिले. स्पष्ट वक्तेपणा, आक्रमकतेतून येणारी प्रभावी मांडणी आणि कार्यकर्त्यांशी जोडलेली आपुलकी हे त्यांचे गुण पक्षनेतृत्वाच्या लक्षात आले. त्यांना शिवसेनेच्या चंद्रपूर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली. ही जबाबदारी त्यांनी मानासाठी नव्हे, तर जनतेशी अधिक नातं घट्ट करण्यासाठी साधली. त्यांनी विधानसभेची पहिली निवडणूक मेहनतीने लढवली, मात्र केवळ दीड हजार मतांनी त्यांचा पराभव झाला. कोणताही तरुण नेता असता, तर तो गडगडून कोसळला असता. पण बाळूभाऊ दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या आंदोलनात उतरले. त्यांची ही वृत्ती अपयशाला स्वीकारून पुन्हा लढण्याची त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख ठरली. यशाच्या या वाटेवर काही प्रस्थापितांना त्यांची वाढती लोकप्रियता सहन झाली नाही. त्यांच्यावर हद्दपारसारखी अन्यायकारक कारवाई झाली. पण बाळूभाऊंनी संयम राखला, लोकांचा विश्वास ढळू दिला नाही. पुढच्या निवडणुकीत त्यांनी सत्ताधारी मंत्र्याला पराभूत करत आमदारपद पटकावलं. तेव्हा ते शिवसेनेत होते, मात्र जनहिताविरोधी कोणताही निर्णय झाला, की ते आपल्या पक्षालाही प्रश्न विचारायला मागेपुढे पाहत नसत. प्रश्न विचारणं, विकासकामांचा पाठपुरावा करणं, निधीसाठी संघर्ष करणं हे त्यांनी आमदार म्हणून सातत्याने केलं. जनतेत त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला होता. बाळूभाऊ आता केवळ नेता नव्हते, तर प्रामाणिक लोकप्रतिनिधी म्हणून लोकांच्या मनात घर करून होते. स्थानिक राजकारणातील विसंवाद, आणि शिवसेनेतील बदललेल्या कार्यपद्धतीमुळे त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ही बाब सोपी नव्हती. अनेकांनी त्यांच्यावर आरोप केले. काँग्रेसच्या उमेदवारीसाठी त्यांना संघर्ष करावा लागला. शेवटी उमेदवारी मिळाली तेव्हा प्रचारासाठी केवळ १५ दिवस शिल्लक होते. राज्यात सत्ताधारी युतीची लाट होती. पण बाळूभाऊंनी प्रचाराचं तंत्र आणि मनं जिंकण्याची कला अचूकपणे वापरली. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात त्यांनी भाजपचा पराभव केला आणि राज्यातील एकमेव काँग्रेस खासदार म्हणून निवडून आले. हा विजय म्हणजे त्यांच्या संघर्षाचा आणि जनतेच्या विश्वासाचा ठसा होता.बाळूभाऊ मोठेपणा मिरवणारे नव्हते. कोणताही नागरिक त्यांच्याकडे गेला, तरी तो त्यांच्या जवळचा माणूसच वाटायचा. कार्यालयात काम तातडीनं मार्गी लावणं, जमल्यास स्वतः कार्यालयात जाऊन काम पूर्ण करून देणं, हे त्यांचं वैशिष्ट्य. म्हणूनच ते सर्वांचे बाळूभाऊ बनले.त्यांचा स्पष्टवक्तेपणा कधी कटू ठरायचा, पण त्याचबरोबर माणसं सांभाळण्याची वृत्ती त्यांच्यात होती. रागावलेल्या माणसालाही समजावून घेऊन पुन्हा जवळ घेण्याचं मोठेपण त्यांच्याकडे होतं. म्हणूनच विरोधकही त्यांचं कौतुक करायचे.कोरोना महामारीच्या काळात अनेक नेते घरातच लपले होते, पण बाळूभाऊ झझए किट घालून रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी फिरत होते. लोकांसाठी त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला. स्वतः आणि त्यांच्या पत्नीला कोरोनाची लागण झाली, पण ते बरे होऊन पुन्हा मैदानात उतरले. बाळूभाऊ प्रत्येक कार्यकर्त्याशी वैयक्तिक संबंध ठेवत. कार्यकर्ता ही संघटनेची ऊर्जा आहे, ही त्यांची धारणा होती. त्यामुळे कार्यकर्त्यांना त्यांनी नेहमी आदर, मार्गदर्शन आणि साथ दिली. त्यांच्या जाण्याने चंद्रपूर मतदारसंघात एक मोठी पोकळी निर्माण झाली. पण त्यांचा वसा आज खासदार प्रतिभाताई धानोरकर समर्थपणे चालवत आहेत. त्यांनी केवळ बाळूभाऊंच्या आठवणी जपल्या नाहीत, तर त्यांची अपूर्ण स्वप्नं पूर्ण करण्यासाठी स्वतःला झोकून दिलं आहे. त्यांच्या कामातही बाळूभाऊंची संवेदना, जिद्द आणि लोकाभिमुखतेचा ठसा स्पष्टपणे जाणवतो.स्वर्गीय बाळूभाऊ धानोरकर हे केवळ राजकारणी नव्हते. ते एक विचारशील, कर्तबगार आणि धाडसी नेता होते. त्यांनी पदासाठी संघर्ष केला नाही जनतेसाठी पद मिळवलं. त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, जिद्द आणि सेवाभाव दिसत असे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा जागर करूया, आणि त्यांच्या प्रेरणादायी वाटचालीला आदरांजली अर्पण करूया.

त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.










# तुमचं स्वप्न माझं व्रत झालं आहे..!

**माझं आयुष्य एका साध्या शेतकरी कुटुंबात सुरू झालं. आई-वडिलांचं कष्टमय जीवन, संयुक्त कुटुंबातली मायेची ऊब, आणि काँग्रेस विचारधारेचं बाळकडू या साऱ्यांमध्ये माझं बालपण गेले.लहानपणापासूनच मनात लोकांसाठी काही तरी करण्याची ओढ होती.पण मुलगी म्हणून माझी स्वप्नं मनातच दडपून ठेवली गेली.घरच्या जबाबदाऱ्यांमुळे ती इच्छा व्यक्त करण्याचं धाडस कधी झालंच नाही.पण आयुष्याला एक वेगळं वळण मिळालं, जेव्हा माझं लग्न धानोऱकर कुटुंबात झालं भद्रावतीत सून म्हणून आले, तेव्हा पती बाळू धानोऱकर शिवसेनेत सक्रीय होते.घरात नव्याने पाऊल टाकताना त्यांनी मला केवळ पत्नी म्हणून नव्हे, तर एक साथीदार म्हणून स्वीकारलं.मी एका संध्याकाळी त्यांच्याशी मनातली इच्छा बोलून दाखवली मलाही सामाजिक काम करायचं आहे... राजकारणात यायचं आहे.तेव्हा त्यांनी क्षणाचाही विलंब न करता सांगितलं अगं, मग आधी लोकांसाठी काम कर. समाजासाठी जग.तो क्षण माझ्या आयुष्यातले नवीन पर्व ठरला.तेव्हापासून मी सामाजिक कार्यात सक्रिय झाले.**

ते माझ्यासाठी केवळ पती नव्हते, तर मार्गदर्शक होते.माझ्या स्वप्नांना त्यांनी स्वातंत्र्य, आधार आणि दिशा दिली. ते जसे तडफदार नेते होते, तसेच प्रेमळ आणि समंजस नवरा देखील होते.ते नेहमी म्हणायचे महिलांनी राजकारणात पुढे आलंच पाहिजे. त्यांच्या आवाजाशिवाय लोकशाही अपूर्ण आहे.आणि त्याची सुरुवात त्यांनी स्वतःच्या घरापासून केली.त्यांच्या प्रत्येक निर्णयात माझा सल्ला असायचा.ते राजकीय असो वा कौटुंबिक .तू काय म्हणतेस? हे त्यांचं वाक्य नेहमीच असायचं.आमचं नातं केवळ पती-पत्नीचं नव्हतं, तर दोघांचं एकत्र स्वप्न पाहणारं, ते पूर्ण करणाऱ्या जोडीदारांचं होतं.लोकसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी मिळाली.ते रणांगणात उतरले, आणि मी त्यांच्या मागे ठाम उभी राहिले.त्यांनी चंद्रपूरसारख्या मोठ्या मतदारसंघातून विजय मिळवला.तेव्हा त्यांच्या डोळ्यांत झळकणारं समाधान आजही माझ्या आठवणीत जसंच्या तसं जपलेलं आहे. त्यानंतर त्यांनी मला विधानसभे साठी उमेदवारी दिली मला निवडून आणले . पत्नीला उमेदवारी दिली म्हणून त्यांच्यावर टीका झाली . सर्व काही सुरळीत सुरू असताना नियतीने घात केला . त्यांनी अचानक आम्हाला सोडून दिलं.शब्द न उच्चारता, हसऱ्या चेहऱ्याने, कायमचा निरोप घेतला.त्या घटनेने माझ्या आयुष्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली. पण मी खचले नाही.कारण माझ्या मनात एक गोष्ट खोलवर ठसली होती त्यांचे स्वप्न अधुरं राहता कामा नये.पक्षाने माझ्यावर विश्वास दाखवला.माझी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर झाली.मी उमेदवार म्हणून उभी राहिले, पण अनेकांनी पाठ फिरवली.काही घरचेच विरोधात उभे राहिले.टीका झाली, अवहेलना झालीपण मी डगमगले नाही.कारण माझ्या पाठीशी त्यांची आठवण होती,त्यांचा विश्वास होता,आणि त्यांच्या नावाची प्रेरणा होती.मी प्रामाणिकपणे मेहनत घेतली.प्रत्येक मतदाराच्या दारात पोहोचले.आणि लोकांनीही माझ्यावर विश्वास दाखवला.मी निवडून आले.हा विजय माझा नव्हता,हा त्यांच्या नावाचा विजय होता.तो त्यांचं अपूर्ण राहिलेलं स्वप्न पूर्ण करण्याचा पहिला टप्पा होता.आजही मतदारसंघात फिरताना, कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत मला त्यांची छबी दिसते.त्यांचं नाव, त्यांचं कार्य, आजही लोकांच्या हृदयात आहे.ते आजही हजारो कुटुंबांचं मार्गदर्शन करतायत आठवणींच्या रूपानं, आणि माझ्या कामाच्या माध्यमातून.ते फक्त माझे पती नव्हते,ते माझ्या विचारांचे, समाजकार्याचे, आणि आत्मिक प्रवासाचे साथी होते.त्यांनी नेहमीच ठाम राहून संघर्ष केला,कधीही सौम्य शब्दांत राजकारण केलं नाही.जनतेच्या दुःखांशी त्यांनी स्वतःला जोडून घेतलं,आणि त्यांना न्याय देण्यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य वाहून टाकलं.आज त्यांच्या जयंतीनिमित्त,मी त्यांना एकच गोष्ट सांगू इच्छिते तुमचं स्वप्न माझं व्रत आहे. तुमचं अधुरं राहिलेलं प्रत्येक कार्य हेच माझं कर्तृत्व ठरेल. तुमचा आवाज माझ्या शब्दांतून पुन्हा जिवंत राहील, तुमचं कार्य माझ्या पावलांमधून पुढं चालत राहील!

**-प्रतिभा बाळू धानोऱकर**
**खासदार, चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा मतदारसंघ**



# प्रिय बाळूभाऊ,

आज तुमचा जन्मदिवस. आजच्या दिवशी तुम्हाला आठवताना मन भरून येतं आणि डोळे पाणावतात. तुम्ही आमच्यातून निघून गेला असलात तरी तुमची आठवण, तुमचं कार्य आणि तुमचा कणखर स्वभाव आजही आमच्या मनात तितकाच जिवंत आहे.
तुमच्या जयंतीदिनी तुम्हाला आठवताना जाणवतंय की, तुमच्यासारखा लोकनेता पुन्हा होणे नाही - न भूतो न भविष्यति!
बाळूभाऊ, तुम्ही चंद्रपूरच्या भूमीत जन्माला आलात आणि याच मातीची सेवा करण्यात आयुष्य वेचलं. तुम्ही फक्त खासदार नव्हता, तर आमच्यासाठी एक कार्य, एक प्रेरणा आणि एक आधारस्तंभ होता. तुम्ही तर बुडणाऱ्या नौकेला योग्य मार्ग दाखवून किनाऱ्यावर आणणारा खंबीर नावाडी होता.
एक कार्यक्षम नेतृत्व, दूरदृष्टी असलेला नेता आणि विजयश्री खेचून आणणारा आक्रमक योद्धा म्हणूनच आम्ही तुम्हाला ओळखत होतो. तुमच्या प्रत्येक कृतीतून आणि निर्णयांतून हेच अधोरेखित झाले.
२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत देशात पंतप्रधान मोदींची दुसरी लाट असतानाही, तुम्ही चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी केलीत. तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांचा पराभव करून तुम्ही विजय मिळवलात आणि विशेष म्हणजे तुम्ही संपूर्ण महाराष्ट्रातून काँग्रेसचे एकमेव खासदार म्हणून निवडून आलात. हा विजय केवळ तुमचा नव्हता, तर तो चंद्रपूरच्या सामान्य जनतेचा विजय होता. तुमच्या या विजयाने जनतेवरील तुमची पकड किती मजबूत होती, हे स्पष्ट झाले.
राजकारणात यशस्वी होण्यासाठी राजकीय वारसा लागतो, हे एक अलिखित सूत्र आहे. पण बाळूभाऊ, तुम्ही हे पूर्णपणे खोटं ठरवलंत. कोणताही राजकीय वारसा नसताना, केवळ स्वकर्तृत्वाच्या बळावर तुम्ही राजकारणात अढळ स्थान निर्माण केलं. एका सामान्य जिल्हा परिषद शिक्षकाचा मुलगा, औषधनिर्माणशास्त्र पदविका घेऊनही नोकरीच्या मागे न लागता, कपड्याचं दुकान सुरू करून तुम्ही व्यवसायात उतरलात. पण अन्याय, शोषण, गरिबांवरील अत्याचार पाहून तुमचं मन अस्वस्थ झालं. कोणत्याही पदावर नसतानाही प्रशासनाला धारेवर धरून तुम्ही लोकांच्या समस्या सोडवल्या आणि त्यामुळेच स्थानिक लोकांच्या मनात स्थान निर्माण केलं.
भद्रावतीसारख्या तालुक्याच्या गावातून सुरू झालेला हा प्रवास आमदार ते खासदार पदापर्यंत पोहोचला. गेली दोन दशके भारतीय जनता पक्षाची चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात मजबूत पकड असताना, त्या परिस्थितीत तुम्ही प्रस्थापितांना आव्हान देऊन सामान्य नागरिकांचा आवाज बनलात. तुमच्याविरोधात अनेक न्यायालयीन केसेस दाखल झाल्या, तुरुंगवासही भोगावा लागला. पण तुम्ही मागे हटला नाहीत. हा संघर्षमय प्रवास आजच्या तरुणांसाठी एक आदर्श आहे.
बाळूभाऊ, तुम्ही कायम लोकहितासाठी तत्पर राहिलात. लोकसभेत चंद्रपूरसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मूर्ती विमानतळाच्या कामासाठी आवाज उठवलात. मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी भूसंपादन प्रलंबित असल्याचं सांगितलं असताना, तुम्ही धावपट्टीची लांबी वाढवण्याचा उपाय सुचवून दूरदृष्टी दाखवली होती.
कोरोना काळात तुमच्यातील लोकसेवक अधिक ठळकपणे दिसून आला. ऑक्सिजनची कमतरता दिसताच तुम्ही ऑक्सिजन प्लांट उभारण्याची धडपड केली. तुमच्या प्रयत्नांतून ग्रामीण भागात ८० बेडवर ऑक्सिजन सुविधा असलेला प्लांट तयार झाला. या कामाचं उद्घाटन स्वतः तुमच्या हस्ते झालं. शिवाय, पहिल्या लाटेत तुम्ही धान्य किट वाटप, शिवभोजन केंद्र, आणि जेवणाचे डबे सुरू करून जनतेसाठी पुढाकार घेतलात.
दुसऱ्या लाटेत, लोक घरी लपून बसले असताना तुम्ही पीपीई किट घालून थेट रुग्णांपर्यंत पोहोचलात, त्यांच्या समस्या ऐकून घेतलात. ही लढाई आपण सगळ्यांनी मिळून लढायची आहे असं सांगून त्यांचं धैर्य वाढवलंत.
तुमच्या कार्यक्षमतेमुळे काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधींनी तुम्हाला पक्षाच्या कार्यकारिणीत स्थान दिलं. केंद्र सरकारच्या कृषी कायद्यांविरोधात तुम्ही तीव्र भूमिका घेतली. तुमच्या आक्रमकतेमागे जनहिताची तळमळ होती. तुमच्या नेतृत्वाची झलक मतदारसंघात पदोपदी जाणवायची.
तुमचा विजयी रथ येथेच थांबला नाही. तुमच्या पाठोपाठ पत्नी प्रतिभा धानोरकरही भरघोस मताधिक्याने आमदार झाल्या. वरोरा रुग्णालयात सुरू केलेली भोजनव्यवस्था आजही सुरु आहे. राजकीय विरोधकही तुमच्या प्रेमळ स्वभावामुळे आपलेसे व्हायचे. पक्षीय भेद बाजूला ठेवून सर्वांना सोबत घेऊन जाण्याची तुमची वृत्ती आजच्या राजकारणासाठी आदर्श होती.
बाळूभाऊ, तुम्ही आमच्यातून निघून गेलात, पण तुमचं कार्य आणि तुमचा संघर्ष आमच्या मनात सदैव कोरलेला राहील. तुम्ही घालून दिलेले आदर्श, तुमची तळमळ आणि जनतेसाठीचा ध्यास हे आम्हाला नेहमीच प्रेरणा देत राहतील. तुमच्या जाण्याने चंद्रपूरने एक सच्चा लोकसेवक गमावला आहे. तुमची पोकळी भरून काढणं अशक्य आहे.
तुमच्या जन्मदिनी, तुमच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन!
तुमचा आदर्श घेऊन आम्ही नेहमीच वाटचाल करत राहू.

**-आपला,**
**गोविल मेहरकुरे, चंद्रपूर**



# असा नेता पुन्हा होणे नाही...!



**विलास टिपले**
**अध्यक्ष, वरोरा शहर काँग्रेस कमेटी.**

२००३ मध्ये राजकीय कारकीर्दीला सुरुवात करताना शिवसेनेच्या किसान सेलच्या उपजिल्हाप्रमुखापासून महाराष्ट्रातील काँग्रेसचे एकमेव खासदार असा बाळूभाऊ धानोरकर यांचा उत्तुंग चढता राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. सर्वसाधारण कुटुंबातील, घरात कोणताही राजकीय वारसा नसतांना केवळ वीस वर्षात राजकारण,समाजकारण व व्यवसायात त्यांनी घेतलेली प्रचंड झेप भाऊंच्या यशस्वीतेची जणू पावतीच होती. विलक्षण लोकसंग्रह भाऊजवळ होता. सर्वच पक्षातील नेते व कार्यकर्त्यांशी ते आपुलकीचे संबंध ठेवत. विकासकामे करताना त्यांनी पक्षीय भेदभाव कधीच बाळगला नाही.वरोरा नगर परिषदेमध्ये त्यांची सत्ता नसतानाही त्यांनी निधी दिला व विकासात्मक कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला,असे अनेक उदाहरण देता येईल. माणसं ओळखण्याची कला जशी भाऊंमध्ये होती, तशी माणसं जोडण्याची कलाही त्यांच्याकडे होती. भाऊशी जुळलेला माणूस सहजासहजी भाऊंशी दूर जात नसे. लोकांमध्ये राहायला भाऊंना नेहमी आवडायचे. सामान्य लोकांमध्ये भाऊंबद्दल विशेष आकर्षण असायचे.भाऊंचा कलरफुल पेहराव, तो हसरा चेहरा, चेहऱ्यावरील तेज, रुबाबदारपणा आकर्षित करणाराच होता. युवकांच्या गळ्यातील तर जणू ताईतच ते होते. कुठल्याही राजकीय, सामाजिक वा कौटुंबिक कार्यक्रमात भाऊ दिसले तर भाऊ सोबतच्या सेल्फीसाठी गर्दी व्हायची. भाऊही कधी कोणास नाराज करताना दिसले नाही.

कार्यकर्त्यांवर जीव लावणारा, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणारा, कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणारा बाळूभाऊ मी अगदी जवळून अनुभवले. विकासात्मक कामांबध्दल भाऊंना नेहमीच तळमळ असायची. जनतेच्या कामाप्रती त्यांचा असलेला उत्साह, पाठपुरावा वाखाणण्याजोगा होता. आपल्या क्षेत्रात उद्योगधंदे आले पाहिजे, तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे यासाठी त्यांची धडपड असायची. मतदारसंघात टेक्स्टाईल पार्क यावा यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू होता. लोकसभेतही त्यांनी हा प्रश्न मांडला होता.परंतु त्यांचे हे स्वप्न अपूर्ण राहिले.कोरोना काळातील त्यांची कार्य मतदारसंघातील नागरिकांच्या सदैव स्मरणात राहील.जीवाची पर्वा न करता केवळ मास्क लावून कोविड रुग्णांच्या कक्षात सहजपणे फिरून त्यांची विचारपूस करणारे बहुदा ते पहिले लोकप्रतिनिधी असावे.
'आक्रमक नेता' अशी भाऊंची ओळख होती.
प्रशासन,अधिकारीवर्गात तर त्यांचा प्रचंड दरारा होता. जनतेच्या प्रश्नासाठी त्यांनी सत्तेत असताना व नसतानांही आंदोलने केली होती. त्यांचा स्वभाव सहृदय असला तरी, वेळानुरूप ते कठोर व्हायचे. फायद्यासाठी त्यांनी स्वतःचा स्वभाव बदलविला नाही वा कधी तडजोडही केली नाही.कोण काय म्हणतो? याची तमा भाऊंनी कधी बाळगली नाही. भाऊ आपल्या मनाप्रमाणे जगला. राजकीय नफा-तोट्याचे गणित त्यांना कधी जमले नाही. असा हा, जनतेशी घट्ट नाळ जोडलेला जिगरबाज, लढाऊ व तेवढाच दिलदार नेता ऐन उमेदीच्या काळात वयाच्या ४८ व्यावर्षी काळाच्या पडद्याआड गेला. भाऊच्या या अकाली जाण्याने धानोरकर परिवारांची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.
मतदारसंघाचे,काँग्रेस पक्षाचे व माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचेही मोठे वैयक्तिक नुकसान झाले आहे.भाऊंवर प्रेम करणारे, त्यांचा चाहता वर्ग किती मोठा होता याचा प्रत्यय त्यांच्या अंत्ययात्रेचे दिवशी पुन्हा एकदा दिसून आला.त्यांच्या अंत्ययात्रेला इतकी अलोट गर्दी जमली होती की, स्मशानभूमीत पाय ठेवायलाही जागा उरली नव्हती. इतका विशाल जनसागर त्यांच्या अंत्यदर्शनाला जमला होता.खरंच भाऊ 'राजा'सारखा जगला व राजासारखा आपल्यातुन निघून गेला. असा नेता आता पुन्हा होणे नाही.दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांची आज जयंती. भाऊंना जयंतीनिमित्त विनम्र आदरांजली.


## राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष पाचुंदकर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा

# राजगणगाव ग्रामपंचायतीच्या ७२ गुंठे जमिनीचा बनावट दस्तऐवजाद्वारे कोट्यवधींचा घोटाळा उघड

**शिरूर । प्रतिनिधी**

राजगणगाव ग्रामपंचायतीच्या मालकीच्या ७२ गुंठे जमिनीच्या खोट्या दस्तऐवजांच्या आधारे हडप करण्याचा आणि खाजगी नोंदी करून कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, शिरूर एमआयडीसी पोलिसांनी या प्रकरणात कारवाई सुरू केली आहे.या बनावट व्यवहारात ग्रामपंचायतीच्या अधिकृत नोंदींमध्ये खाडाखोड, बनावट पाणचिठ्ठ्या तयार करून, त्या आधारे जमिनीवर खोटे हक्क मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या संदर्भात पोलिसांनी ग्रामसेवक लिपिक संतोष गणपत शिंदे (रा. राजगणगाव) याला काही आठवड्यांपूर्वी अटक केली होती.


पोलिस तपासात समोर आले की, हा संपूर्ण कट कारस्थानपूर्वक रचला गेला होता. पाचुंदकर यांच्या सांगण्यावरून ग्रामपंचायतीच्या नोंदी व दस्तऐवजांमध्ये फेरफार करून बनावट मालकी दाखवली गेली. त्यांच्या पत्नी स्वाती पाचुंदकर यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे प्राथमिक चौकशीत उघड झाले आहे. त्यामुळे दत्तात्रय पाचुंदकर यांना थेट आरोपी करून अटक करण्यात आली असून, त्यांना शिरूर न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.तपासादरम्यान, तत्कालीन ग्रामसेवक हनुमंत लक्ष्मण चव्हाण (रा. शिरूर बायपास) व ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच आणि गणपती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्ष स्वाती पाचुंदकर यांचीही चौकशी सुरू आहे. त्यांच्या भूमिकेची सखोल तपासणी केली जात असून, आणखी काही सरकारी कर्मचारी व ट्रस्ट पदाधिकाऱ्यांचा या प्रकरणात सहभाग असल्याची शक्यता आहे.पोलिस निरीक्षक महादेव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास जलद गतीने सुरू आहे. पोलिसांकडून या संपूर्ण व्यवहाराची बारकाईने चौकशी होत असून, अजून काही नावं लवकरच उघडकीस येण्याची शक्यता पोलिस सूत्रांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, दत्तात्रय पाचुंदकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.हा घोटाळा केवळ एका जमिनीच्या व्यवहारापुरता मर्यादित नसून, ग्रामपंचायत व ट्रस्टच्या मालकीच्या इतर जमिनींचे खाजगीकरण करण्यासाठी बनावट दस्तऐवज तयार करणारे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाचा पारदर्शक व सखोल तपास व्हावा, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.





## लोकनेते व्यंकटराव हिरे यांची ४५ वी पुण्यतिथी;प्रेरणादायी कार्यास अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**





महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय, पंचवटी नाशिक येथे संस्था सवर्धक लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे आणि उपप्राचार्या डॉ. सुचिता सोनवणे यांच्या शुभहस्ते लोकनेत्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जगदाळे होते. आपल्या मनोगतात त्यांनी लोकनेते हिरे यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा व्यापक आढावा घेतला. ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर झटले. त्यांचे जीवन हे आजच्या पिढीसाठी प्रेरणास्थान आहे,असे त्यांनी स्पष्ट केले. पुण्यतिथीच्या औचित्याने, सेवानिवृत्त होत असलेल्या प्राध्यापकांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत महाविद्यालय परिसरात हिरवळ वाढविण्याचा संकल्प यानिमित्ताने करण्यात आला. यानंतर उपस्थितांनी लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या समाधीस्थळी जाऊन पुष्पांजली अर्पण केली. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांचे उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. पी. के. शेवाळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. ए. पी. महाजन यांनी केले.

## राज्यपालांच्या हस्ते सचिन जोशी यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

### सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल; मुंबईतील कार्यक्रमात होणार गौरव

**परभणी । प्रतिनिधी**

पालम तालुक्यातील चाटोरी येथील अरुणोदय सेवाभावी संस्था संचलित स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाचे सचिव आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन जोशी यांना पीपल्स एज्युकेशन संस्थेच्या वतीने दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार यंदा जाहीर झाला आहे.या पुरस्काराचे वितरण महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आणि केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी, दि. ८ जुलै २०२५ रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये संपन्न होणार आहे. कार्यक्रम पीपल्स एज्युकेशन संस्थेच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केला आहे.सचिन जोशी गेली वीस वर्षे अरुणोदय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून चाटोरी आणि पंचक्रोशी परिसरात विविध सामाजिक उपक्रम



राबवत आहेत. साहित्य संमेलने, ग्रंथालय शिबिरे, महाआरोग्य शिबिरे, गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, कॉल ऑन ब्लड उपक्रम, मोफत शिक्षण तसेच आरोग्य विषयक जनजागृती मोहिमा यांच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अनुसरून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांसाठी सातत्याने कार्य केल्यामुळे पीपल्स एज्युकेशन संस्थेने त्यांची पुरस्कारासाठी निवड केली आहे.पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना सचिन जोशी म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संस्थेकडून मिळणारा हा पुरस्कार अत्यंत सन्मानाची बाब आहे. बाबासाहेबांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांनुसार कार्य करण्याची ऊर्जा या पुरस्कारामुळे अधिकच वाढली आहे.सचिन जोशी यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल खासदार डॉ. फौजिया खान, आमदार राजेश विटेकर, नरहरी ढगे, संस्थेचे अध्यक्ष प्रा. संदीप किरडे, उपाध्यक्ष प्राचार्य दगडू पवार, कोषाध्यक्ष सुभाष ढगे, प्रा. डॉ. जयंत बोबडे, गोविंदराव पाठक, सखाराम जोशी, गंगाधर मस्के यांच्यासह चाटोरी ग्रामस्थांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# शेतकऱ्याच्या विहिरीतील सोलर पाणबुडी मोटार चोरीला

### १५ हजाराचे नुकसान; शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील करडे गावात शेतकऱ्याच्या विहिरीतील सोलर पद्धतीची पाणबुडी मोटार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या चोरीमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.फिर्यादी सुरेश नारायण लंघे (वय ६०, रा. करडे, ता. शिरूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३० जून रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते १ जुलै सकाळी ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत त्यांच्या गट नंबर ५५४ मधील विहिरीतील ५ एच.पी. क्षमतेची सोलर मोटार चोरीस



गेली. प्रधानमंत्री कुसुम योजना आणि महाराष्ट्र कृषी ऊर्जा अभियान अंतर्गत मिळालेली ही सोलर मोटार सुमारे १५ हजार किमतीची होती.

मोटारसोबत पाईप व केबल वायर देखील तोडून नेण्यात आले असून, शेतकऱ्याला दुहेरी नुकसान सहन करावे लागत आहे. अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्याच्या संमतीशिवाय व आर्थिक फायद्याचा हेतू ठेवून ही चोरी केल्याचे स्पष्ट आहे.या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गु. र. नं. ४७०/२०२५ अन्वये अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय दंड संहिता कलम बी एन एस ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार बनकर यांच्या कडे सोपविण्यात आला असून, प्रभारी अधिकारी पो.नि. संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. शेतीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असलेली मोटार चोरीला गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. परिसरात या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## जोडवाडी येथे कृषिदिनानिमित्त कृषिदूतांकडून वृक्षारोपण

**पिशोर । जावेद शेख**

हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जोडवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कृषिदिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले असून आंबा, जांभूळ, वड व चिंच अशा उपयुक्त वृक्षांची लागवड करण्यात आली.वृक्षारोपण कार्यक्रम सरपंच संगीता घुसिंगे, कृषिसहाय्यक पूनम जाधव आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मंगल ठोबे यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे सदस्य, शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्नित कृषी महाविद्यालय बदनापूर येथील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व कृषी औद्योगिक संलग्नता अंतर्गत जोडवाडी गावात प्रत्यक्ष अनुभवासाठी कार्यरत असताना हा उपक्रम आयोजित केला.या उपक्रमाचे संयोजन कृषिदूत



विशाल जंगले, दिग्विजय मोहिते, गणेश टाले, वैभव शिंदे आणि प्रज्वल म्हस्के यांनी केले. विद्यार्थ्यांना या उपक्रमासाठी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. डी. के. पाटील, डॉ. एन. डी. देशमुख आणि डॉ. एस. जे. सुपेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.पर्यावरण जपण्यासाठी आणि शालेय परिसरात हरित पट्टा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

### त्रिभाषा सूत्र तुम्हीच स्वीकारलं विसरलात की काय?

## शिंदे गटाची ठाकरे गटाविरोधात बॅनरबाजी; मराठीच्या मुद्यावर तापलं राजकारण

**मुंबई । विराम पवार**

राज्यात पावसाळी अधिवेशन सुरु असतानाच त्रिभाषा सूत्र आणि मराठी भाषा या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाने आक्रमक पवित्रा घेत उद्धव ठाकरे यांच्या विरोधात बॅनरबाजी करत राजकीय चर्चेला नवा कलाटणी दिला आहे.मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि मुंबई महापालिका मुख्यालयाजवळ झळकलेल्या बॅनर्समुळे खळबळ माजली आहे. त्रिभाषा सूत्र तुम्हीच स्वीकारलं विसरलात की काय? आणि सत्य बाहेर आले, घशात गेले दात, उबाठानेच केला मराठीचा घात अशा थेट आणि धारदार मजकुरातून ठाकरे गटावर शाब्दिक हल्ला चढवण्यात आला आहे.




उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या शिफारशींना मान्यता देण्यात आली होती. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कार्यगटाच्या शिफारशी मुख्यमंत्र्यांकडे सादर झाल्याचा उल्लेखही या बॅनरमध्ये करण्यात आला आहे.शिंदे गटाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत मराठीच्या मुद्यावर ठाकरे गटाविरोधात आक्रमक भुमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. त्यानंतर शहरभर लावण्यात आलेली बॅनरबाजी ही त्या धोरणाचा भाग असल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, एकीकडे काँग्रेस नेते नाना पटोले आणि रोहित पवार हेही मराठीच्या मुद्द्यावरून मुखर भूमिका घेत असल्याने, विरोधकांच्या टीका आणि सत्ताधाऱ्यांच्या आरोप-प्रत्यारोपामुळे या विषयावर राज्यातील राजकारण चांगलेच चिघळले आहे.या बॅनरबाजीनंतर ठाकरे गट किंवा महाविकास आघाडीकडून काय प्रत्युत्तर येते, याकडे राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# पोंभूर्णा एमआयडीसीच्या निर्माणाचा मार्ग मोकळा-आ.मुनगंटीवार यांच्या मागणीला यश

### उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सभागृहात दिले आश्वासन

### १०२ हेक्टर क्षेत्राच्या भूसंपादनाला मान्यता, उर्वरित प्रक्रिया ६० दिवसांत पूर्ण होणार ; उद्योग विभागानी केले आश्वस्त

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा येथे एमआयडीसी होण्यासाठी २००९ पासून सातत्याने पाठपुरावा केला. पंधरा वर्षांच्या या संघर्षाला अखेर यश आले आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात उद्योग राज्यमंत्री इंद्रनीलजी नाईक यांनी पोंभूर्णा एमआयडीसी वर्षभरात सुरू करण्याचे स्पष्ट आश्वासन आ. मुनगंटीवार यांना दिले.या मुद्द्यावर अर्धा तास झालेल्या चर्चेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आतापर्यंतच्या पाठपुराव्याची आठवण करून दिली. एनओसी, नकाशा, नाहरकत प्रमाणपत्र, बैठकांचे इतिवृत्त आणि कालबाह्य प्रक्रियांमुळे हा प्रकल्प कसा लांबणीवर पडला, हे त्यांनी तपशीलवार मांडले. यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्री महोदयांकडे चार ठोस मागण्या करत लक्ष वेधले. संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक तत्काळ घेणे, चंद्रपूर जिल्ह्यातच राज्य उद्योग मित्र नेमावा, मंत्री महोदयांनी चंद्रपूर दौरा करून प्रत्यक्ष पाहणी करावी, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात वाढ करावी, या मागण्यांचा यामध्ये समावेश होता.



उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी यावेळी सकारात्मक भूमिका घेत पोंभूर्णा एमआयडीसीसाठी १०२.५० हेक्टर भूसंपादन प्रस्तावाला मान्यता मिळाल्याची माहिती दिली. या अंतर्गत ४२.५९ हेक्टर शेतकऱ्यांशी थेट खरेदी करून २ कोटी ३५ लाखांचा मोबदला दिला गेला आहे. उर्वरित जमिनींसाठी ३३/३ ची नोटीस जारी करण्यात आली आहे. आ.सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागण्याबाबत मंत्री नाईक म्हणाले, 'यासंदर्भात अधिवेशन कालावधीतच बैठक आयोजित केली जाईल. चंद्रपूर येथे राज्य उद्योग मित्र नेमण्यात येईल. उर्वरित भूसंपादन प्रक्रिया ६० दिवसांत पूर्ण केली जाईल आणि अधिकाऱ्यांकडून दर आठवड्याला प्रगती अहवाल आमदार श्री. मुनगंटीवार यांना सादर केला जाईल. जमिनीच्या दरांसंदर्भात लवकरच बैठक घेण्यात येईल.' यासोबतच पुढील महीन्यात मी स्वतः चंद्रपुरात येतो, असे आश्वासनही राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी यावेळी दिले.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या मागणी नंतर कामगार मंत्री चंद्रपुरासाठी घेणार विशेष बैठक

## पावसाळी अधिवेशनात आ.जोरगेवार यांची मागणी, कामगारांचे प्रश्न लागणार मार्गी

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

अनेक औद्यागीक संस्थांनी सुरक्षारक्षकांची मागणी केली आहे. ते नौकरी देण्यास तयार आहे. मात्र सुरक्षा रक्षक मंडळ कामगारांची नोंदणी करुन घेत नसल्याने नोंदणीकृत कामगारांची संख्या कमी आहे. परिणामी मागणी असूनही कामगार पूरवता येत नसल्याचा आरोप करत सूरक्षारक्षक मंडळाने तात्काळ सुरक्षा रक्षकांची नोंदणी करावी याबाबत कामगार मंत्री यांनी चंद्रपूरसाठी बैठक लाववी अशी मागणी पावसाळी अधिवेशनात बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. आहे. यावर अधिवेशन संपताच विशेष बैठक घेण्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी मान्य केले आहे. पावसाळी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या सत्रात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगारांचा प्रश्न उपस्थित करून येथील सुरक्षारक्षकांच्या समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावर उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी अधिवेशन संपल्यानंतर या संदर्भात विशेष बैठक घेण्यात येईल, असे सांगितले. त्यामुळे औद्योगिक जिल्हा असलेल्या चंद्रपूरमधील कामगारांचे प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात सध्या ५० हजारांहून अधिक कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. मात्र त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारी सक्षम यंत्रणा अद्याप अस्तित्वात नाही. अनेक आस्थापनांनी आपल्या सुरक्षारक्षकांची नोंद केली असली, तरी प्रशासनाकडून त्यांच्या नोंदणीबाबत उदासीनता आहे. परिणामी, या कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे चंद्रपूर येथे विशेष बैठक घेऊन कामगारांचे प्रश्न सोडवावेत, अशी मागणी पावसाळी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.



आज विधीमंडळात या मुद्द्याकडे लक्ष वेधताना आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे विशेष मागणी करत सांगितले की, चंद्रपूर जिल्ह्यातील कंत्राटी कामगार, विशेषतः सुरक्षारक्षक यांच्या नोंदणी प्रक्रियेत अपुऱ्या यंत्रणेचा फटका कामगारांना बसतो. त्यामुळे या कामगारांचे हक्क आणि कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. कामगार मंत्री यांनी स्वतः चंद्रपूर जिल्ह्याला भेट द्यावी, स्थानिक अधिकाऱ्यांसोबत बैठक घ्यावी आणि या कामगारांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

या मागणीला उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, लवकरच चंद्रपूर जिल्ह्यातील कामगार समस्यांवर विशेष बैठक घेण्यात येईल. तसेच सुरक्षारक्षक कामगारांची नोंदणी करण्याचे आदेश दिले जातील असेही त्यांनी स्पष्ट केले. यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो कंत्राटी कामगारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले जाणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# देलवडीच्या जि.प.शाळेतील आरव कोल्हेचे राज्यस्तरीय परीक्षांमध्ये लक्षणीय यश

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील देलवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या इयत्ता पहिलीच्या आरव अमोल कोल्हे या विद्यार्थ्याने राज्यस्तरावर विविध प्रज्ञाशोध आणि बुद्धिमत्ता चाचणांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता अधोरेखित केली आहे.



बालवयातच असामान्य बुध्दिमत्ता आणि अभ्यासाची गोडी यामुळे आरवने वयाच्या पहिल्याच टप्प्यावर दहा वेगवेगळ्या राज्यस्तरीय परीक्षा दिल्या आणि त्यामध्ये आघाडीची कामगिरी बजावली.

योग्य मार्गदर्शन, मेहनत, आणि स्वतःची जिद्द यांच्या आधारावर आरवने विविध परीक्षांमध्ये राज्यात तिसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळवले. त्याने मंथन, जीटीएस, एक्सलंट ऑलिंपियाड, बीटीएस, अभिरुप, एटीएस, लक्षवेध, पंढरपूर टॅलेंट सर्च, बीडीएस अशा अनेक परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण प्राप्त केले असून, अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशनमध्ये तर तो देशपातळीवर प्रथम क्रमांक मिळवत ठळक ठरला आहे. या साऱ्यामुळे इयत्ता पहिलीत शिकणारा एक जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी उदाहरण बनला आहे.

शालेय जीवनात सुरुवातीपासूनच आरवचा अभ्यासाकडे ओढा असून, तो हसत खेळत शिक्षण घेत विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करतो. शैक्षणिक ओझ्याशिवाय आनंदी शिक्षण मिळण्याची संधी जिल्हा परिषद शाळांमध्येही उपलब्ध आहे, हे आरवच्या यशावरून अधोरेखित होते.

त्याच्या यशामागे शाळेच्या शिक्षिका श्रीमती छाया लडकत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, रजिस्टर्ड मार्गदर्शक राजू भोंग सर यांनीदेखील आरवला योग्य दिशा दिली.आरवच्या या यशाबद्दल पंचायत समिती करमाळयाचे गटशिक्षणाधिकारी जयवंत नलावडे, शिक्षण विस्तार अधिकारी नितीन कदम, केंद्रप्रमुख महावीर गोरे, सरपंच रेखाताई ढवळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण ढवळे आणि आशाताई गोविंदे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. जिल्हा परिषद शाळेतील मुलं जर योग्य मार्गदर्शन आणि प्रेरणेमुळे अशा प्रकारे चमकू शकतात, तर ग्रामीण भागातील शाळांमध्येही उज्वल भविष्यासाठीची सर्व क्षमता दडलेली आहे, हे आरवच्या यशातून स्पष्ट दिसून येते.




# मुल येथे कृषिदिन उत्साहात साजरा प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव

**। प्रतिनिधी। प्रतिनिधी**



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पंचायत समिती, मुल आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मुल यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृहात कृषिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी अरुण चनफने तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका कृषी अधिकारी सुनील कारडवार उपस्थित होते.यावेळी खरीप भात पीक स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळवणारे शेतकरी पियुष येनगंटीवार (बोरचांदली) व तुलाराम नन्नावरे (भवराळा) यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत संदेश डोंगरे (चक घोसरी), फळबाग लागवडीत दिपक गुरनुळे (मूल), तर मस्यपालन, कुक्कुटपालन व शेळीपालन यांसारख्या कृषि पूरक व्यवसायासाठी पंकज गेडाम (टेकाडी) यांना शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी अधिकारी कु. मनिषा राजनहिरे यांनी कै. वसंतराव नाईक यांच्या कार्यावर प्रकाश टाकत, पंचायत समितीच्या विविध योजनांची माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी सुनील कारडवार यांनी महाडीबीटी, फळबाग लागवड, ग्री स्ट्रक योजना आदींबाबत मार्गदर्शन करत, नैसर्गिक शेती व सधारीत तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन खर्चात बचत व नफ्यात वाढ करण्याचे आवाहन केले.सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री. सतीश बनकर यांनी नरेगा योजनेंतर्गत बांध, नाले काठ व पडीक जमिनीवर बांबू लागवडीचे महत्त्व विशद केले. उपकृषी अधिकारी श्रीकांत कारडे यांनी पीक स्पर्धा, पीएम किसान सन्मान निधी, गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात गटविकास अधिकारी अरुण चनफने यांनी शेतकऱ्यांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेत शेतीत प्रगती साधावी असे आवाहन केले.कार्यक्रमास तालुक्यातील सुमारे ७० शेतकरी उपस्थित होते. शिल्पा मंत्रिवार (उपकृषी अधिकारी, बंबाळ) यांनी कार्यक्रमाचे संचालन केले, तर स्वाती खिल्लारे (सहाय्यक कृषी अधिकारी, पिपरी दिक्षीत) यांनी आभार प्रदर्शन केले.






सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .